# महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

# मार्च महिन्यातील कामांचा तपशील

## ऊस

- सुरू ऊसासाठी मार्चच्या पहिल्या आठवडयात संजीवकांच्या पहिल्या फवारणीसाठी हेक्टरी १५० लिटर पाणी लागेल. त्याकरिता जी.ए. ३ जिब्रेलिक ॲसीड (४० पीपीएम) ६ ग्रॅम, ६ बी.ए. : ६ बेन्झिल ॲडेनाईन (४० पीपीएम) ६ ग्रॅम, १५०० ग्रॅम १९:१९:१९, ३७५ ग्रॅम चिलेटेड सुक्ष्म अन्नद्रव्य व ७५० ग्रॅम सिलिकॉन (सिलिसायलिक ॲसिड) एकत्रित करून उसाच्या पानावर फवारणी करावी.
- १६ आठवडे पूर्वहंगामी वयाच्या लागणीस हेक्टरी एकूण शिफारशीत खतमात्रेच्या १० टक्के नत्र (३४ किलो नत्र) म्हणजेच ७४ किलो निमकोटेड युरीया खताचा तिसरा हप्ता द्यावा.
- पक्क्या भरणीयोग्य वाढलेल्या २० आठवडे वयाच्या ऊसात आंतरपीके घेतली असल्यास त्यांची परिस्थीती पाहून काढणी करा अथवा सरीतच दाबून भरणीची तयारी करा. यावेळी नांगरीच्या सहाय्याने सरीचे वरंबे फोडून बाकी राहीलेली रासायनिक खतांची मात्रा ४० टक्के (१३६ किलो नत्र) म्हणजेच २९५ किलो युरीया (६.५६ पोती), ५० टक्के स्फुरद व पालाश (प्रत्येकी ८५ किलो) म्हणजेच ५३१ किलो सिंगल सुपर फॉस्फेट (११.८ पोती) आणि १४२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश (३.१६) एकत्र चांगले मिसळून हेक्टरी एकूण सऱ्यांच्या संख्येत विभागून रिजरने भरणी करावी व रानबांधणी करून लगेच पाणी द्यावे.
- आवश्यकतेनुसार जमिनीचा मगदुर आणि जमिनीतील ओलावा पाहून ८ ते १० दिवसाच्या अंतराने नियमित पाणीपुरवठा करावा.
- ठिबक सिंचनाची सोय असल्यास १० ते २० आठवडयापर्यंत ऊसाच्या वाढीच्या अवस्थेनुसार प्रति हेक्टरी ९ किलो नत्र, ५ किलो स्फुरद व ३ किलो पालाश पाण्यात विरघळणारे ही अन्नद्रव्ये सात दिवसांच्या अंतराने अकरा समान हप्त्यात विभागून ठिबक सिंचन प्रणालीमधून द्यावीत.
- सुरु ऊसाची लागण झालेल्या क्षेत्रावर उगवण विरळ झाली असल्यास त्या ठिकाणी लागणीच्या वेळी प्लॅस्टिक पिशवीत अथवा गादी वाफ्यावर वाढवलेली समवयस्क रोपे वापरून नांग्या भरून घ्याव्यात व त्वरीत हलके पाणी द्यावे.
- खोड किडीच्या नियंत्रणासाठी ऊस लागणीनंतर ४५ दिवसांनी ऊसाची बाळ बांधणी करावी. उसात मका, ज्वारी ही आंतरपिके न घेता, कोथिंबीर व पालक ही आंतरपिके घ्यावीत. खोडकीडग्रस्त ऊस देठ मुळासह उपटून अळीसह नष्ट करावा. हेक्टरी ५ फुले ट्रायकोकार्ड १० दिवसाच्या अंतराने ३ वेळा लावावा. खोड किडीच्या प्रादुर्भावामुळे ऊसाचे शेंडे वाळत असतील तर आंतरपीक नसलेल्या क्षेत्रात आवश्यकता असल्यास क्लोरॅन्ट्रॅनिलीप्रोल ०.४% दाणेदार हे औषध १८.७५ किलो अथवा फिप्रोनिल ०.३% दाणेदार हे औषध २५ ते ३० किलो प्रति हेक्टरी या प्रमाणात जमिनीतून द्यावे.
- ६ ते ८ आठवडे वयाच्या सुरु ऊसाला नत्र खताचा दुसरा हप्ता ४० टक्के नत्र (१०० किलो नत्र) म्हणजेच हेक्टरी २१७ किलो युरिया (४.८२ पोती) आणि १२ आठवडे वयाच्या सुरु ऊसाला नत्र खताचा तिसरा हप्ता १० टक्के नत्र (२५ किलो नत्र) म्हणजेच हेक्टरी ५५ किलो युरिया ६:१ या प्रमाणात निंबोळी पेंडीबरोबर मिसळून समप्रमाणात विभागून घ्यावा व दुसऱ्या दिवशी हलकेसे पाणी द्यावे. तसेच आवश्यकतेनुसार जमिनीतील ओल पाहून ८ ते १० दिवसाच्या अंतराने पाण्याच्या पाळया द्याव्यात.
- ठिबक सिंचनाची सोय असल्यास डिसेंबरमध्ये लागण केलेल्या ऊसाकरीता वाढीच्या आवस्थेनुसार प्रति हेक्टरी ९ किलो नत्र, ५ किलो स्फुरद व ३ किलो पालाश पाण्यात विरघळणारे हि अन्नद्रव्ये सात दिवसांच्या अंतराने अकरा समान हप्त्यात विभागून ठिबक सिंचन प्रणालीमधून द्यावीत. जानेवारीमध्ये लागण केलेल्या ऊसाकरीता वाढीच्या आवस्थेनुसार प्रति हेक्टरी १४ किलो नत्र, ६.५ किलो स्फुरद व ३ किलो पालाश हि अन्नद्रव्ये सात दिवसांच्या अंतराने पाच समान हप्त्यात विभागून ठिबक सिंचन प्रणालीमधून द्यावीत. फेब्रुवारीमध्ये लागण केलेल्या ऊसाकरीता वाढीच्या आवस्थेनुसार प्रति हेक्टरी ७.५ किलो नत्र, २.५ किलो स्फुरद व २.५ किलो पालाश हि अन्नद्रव्ये सात दिवसांच्या अंतराने चार समान हप्त्यात विभागून ठिबक सिंचन प्रणालीमधून द्यावीत.
- सुरू ऊसासाठी मार्चच्या तिसऱ्या आठवडयात संजीवकांच्या दुसऱ्या फवारणीसाठी हेक्टरी २२५ लिटर पाणी लागेल. त्याकरिता जी.ए. ३ जिब्रेलिक ॲसीड (४० पीपीएम) ९ ग्रॅम, ६ बी.ए. : ६ बेन्झिल ॲडेनाईन (४० पीपीएम) ९ ग्रॅम, २२५० ग्रॅम १९:१९:१९, ५६२ ग्रॅम चिलेटेड सुक्ष्म अन्नद्रव्य व ११२५ ग्रॅम सिलिकॉन (सिलिसायलिक ॲसिड) एकत्रित करून उसाच्या पानावर फवारणी करावी.
- ऊस तोडणीनंतर पाचट सरीत दाबून घ्यावे.
- ऊसाचे बुडखे मोकळे करून धारदार कोयत्याने जमिनीलगत छाटून घ्यावेत व छाटलेल्या बुडख्यांवर १० ग्रॅम कार्बेन्डॅझिम १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.
- पाचट कुजविण्यासाठी पाचटावर प्रति हेक्टरी ८० किलो युरिया, १०० किलो सिंगल सुपर फॉस्फेट टाकावे व त्यानंतर १० किलो पाचट कुजविणारे जिवाणू शेणखतात मिसळून पाचटावर टाकावे.
- पहिले पाणी दिल्यानंतर ३ ते ४ दिवसांनी वापश्यावर आल्यानंतर पहारीच्या सहाय्याने हेक्टरी १५० किलो नत्र (३२५ किलो युरिया), ७० किलो स्फुरद (४३७ किलो सिंगल सुपर फॉस्फेट), ७० किलो पालाश (११७ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) यांचे मिश्रण तसेच प्रति हेक्टरी झिंक सल्फेट २० किलो, फेरस सल्फेट २५ किलो याप्रमाणात शेणखतात मिसळून एकत्र करून बुडख्यापासून सरीच्या एका बाजूला ३० सें.मी. अंतरावर व १५ सें.मी. खोलीवर पहारीच्या सहाय्याने द्यावीत.
- फेब्रुवारीपुर्वी तोडणी झालेल्या ऊसाचाच खोडवा राखावा. किड व काणीग्रस्त क्षेत्र असल्यास खोडवा ठेवू नये. तसेच कमीत कमी हेक्टरी १ लाख ऊसाची संख्या असलेल्या क्षेत्राचाच खोडवा ठेवावा.
- ठिबक सिंचनाची सोय असल्यास १० ते २० आठवडयांदरम्यान वय असलेल्या खोडव्यास प्रति हेक्टरी ९ किलो नत्र, ५ किलो स्फुरद व ३ किलो पालाश हि अन्नद्रव्ये सात दिवसांच्या अंतराने अकरा समान हप्त्यात विभागून ठिबक सिंचन प्रणालीमधून द्यावीत. ५ ते ९ आठवडयांदरम्यान वय असणाऱ्या खोडवा पिकास प्रति हेक्टरी १४ किलो नत्र, ६.५ किलो स्फुरद व ३ किलो पालाश हि अन्नद्रव्ये सात दिवसांच्या अंतराने पाच समान हप्त्यात विभागून ठिबक सिंचन प्रणालीमधून द्यावीत. तर १ ते ४ आठवडयांदरम्यान वय असणाऱ्या खोडवा पिकास प्रति हेक्टरी ७.५ किलो नत्र, २.५ किलो स्फुरद व २.५ किलो पालाश पाण्यात विरघळणारे हि अन्नद्रव्ये सात दिवसांच्या अंतराने चार समान हप्त्यात विभागून ठिबक सिंचन प्रणालीमधून द्यावीत.

## भुईमूग (उन्हाळी)

- भुईमूगाच्या उपटया वाणासाठी पेरणीनंतर ३५ व ४५ दिवसांनी दोन वेळा पिकांवर रिकामा ड्रम फिरवावा.
- उभ्या पिकांतील सुक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता भरुन काढण्यासाठी ०.५ टक्के लोह व ०.२ टक्के झिंक सल्फेट या मिश्रणाची पेरणीनंतर ३०, ५० व ७० दिवसांनी फवारणी करावी.
- पाने पोखरणाऱ्या किंवा गुंडाळणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी क्विनॉलफॉस २५ ई.सी. २० मिली या प्रमाणात १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पाने खाणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी क्लोरोपायरीफॉस २०% प्रवाही १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

## गहू

- पीक तयार होताच वेळेवर कापणी करावी. काही जातींचे दाणे शेतात झडतात. त्यामुळे बरेच नुकसान होते. म्हणून पीक पक्व होण्याच्या २ ते ३ दिवस अगोदर कापणी करावी. कापणीच्यावेळी दाण्यातील ओलाव्याचे प्रमाण १५ टक्के असावे. गव्हाची मळणी यंत्राच्या सहाय्याने करावी. मळणी करतांना दाणे फुटणार नाहीत याची काळजी घ्यावी.

## फळबाग व्यवस्थापन

- **डाळिंब** : रस शोषणाऱ्या फुलकिडे, फळ पोखरणारी अळी या किडींचे नियंत्रण करावे. मधमाशी पेट्यांचे संवर्धन करावे. तेल्या रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी हंगामी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात. पाणी नियंत्रित वापरावे.
- **सिताफ़ळ** : नत्रांची उर्वरीत मात्रा दयावी. बहार धरलेल्या बागेत मशागत पूर्ण करावी.
- **बोर** : बाग ताणावर सोडावी.
- **आवळा** : अनावश्यक फांदया काढाव्यात.
- **कागदी लिंबू व मोसंबी** : गरजेनुसार सुक्ष्म अन्नद्रव्यांची फवारणी करावी. सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता आढळल्यास फुले द्रवरूप सुक्षग्रेड II ची १०० मिली १० लि. पाण्यातून फुले येण्यापूर्वी व सेटींग झाल्यानंतर अशा दोन वेळेस फवारणी करावी.
- **आंबा** : आवश्यकतेनुसार बागेस पाणी द्यावे.

## भाजीपाला व्यवस्थापन

- उन्हाळी वेलवर्गीय भाजीपाला पिकांस खुरपणी देऊन नत्र खताचा दुसरा हप्ता द्यावा.
- वेलवर्गीय पिकांना आधार देण्याचे काम पूर्ण करावे.
- उन्हाळी भेंडी काढणी एक दिवस आड करावी.
- गवार पिकाची काढणी सुरू करावी.
- रबी टोमॅटो पिकाची काढणी योग्य वेळी करावी.
  लांब अंतराच्या बाजारपेठेसाठी पाठवायचे असल्यास फळांवर लाल रंगाची छटा आल्यावर टोमॅटोची काढणी करावी.
- रबी हंगामातील कोबीवर्गीय पिकांची काढणी करावी.
  रबी हंगामातील लसूण पिकांवर कोळी या किडीचा प्रार्दुभाव होण्याची शक्यता असते. कोळीच्या नियंत्रणासाठी योग्य ते उपाय करावेत.
- रबी हंगामातील कांदा पीक पोसण्याचे अवस्थेत असल्यास पालाशयुक्त खताचा फवारा द्यावा.
- वेलवर्गीय भाजीपाल्यावर भुरी व करपा रोगाचा प्रार्दुभाव दिसून आल्यास नियंत्रणाचे उपाय करावेत.
- कांदा व लसूण पिकावरील करपा व फुलकिडीचे नियंत्रण करावे.
- भेंडी पिकावर येणारी पांढरीमाशी विषाणूजन्य रोगाचा प्रसार करते त्यामुळे पांढरी माशीचे वेळीच नियंत्रण करावे.
- उन्हाळी टोमॅटोचे पीक एक महिन्याचे झाल्यावर खुरपणी करून नत्र खताची मात्रा द्यावी.
- मिरची व वांगी रोपे तयार झाली असल्यास रोपांची पुर्नलागवड करावी लागवडीचे वेळेस संपूर्ण खतमात्रेच्या ५० टक्के नत्र, संपूर्ण स्फुरद व पालाश द्यावे.

## आले

- पूर्वमशागत जसे १ फूट खोल उभी व आडवी नांगरट करुन १ ते २ कुळवाच्या पाळ्या जमीन भुसभुशित करावी.
- हेक्टरी ७५ किलो स्फुरद व ७५ किलो पालाश या खतांचा संपूर्ण हप्ता द्यावा.
- शेवटच्या कुळवाच्या पाळी आगोदर हेक्टरी ३५ ते ४० टन चांगले कुजलेले शेणखत द्यावे.
- जमिनीतील बहुवार्षिक तणांचे कंद, काश्या वेचून गोळा कराव्यात, मोठे दगड-गोटे वेचून काढावेत.
- जमिनीच्या प्रकारानुसार लागवड प्रामुख्याने सपाट वाफे, सरी वरंबा पध्दत आणि रुंद वरंबा किंवा गादी वाफ्यावर करावी.
- सपाट वाफे पध्दतीत जमिनीच्या उतारानुसार २X१ मी. किंवा २X३ मी. चे सपाट वाफे करुन २०X२० सें.मी. किंवा २२.५X२२.५ सें.मी. अंतरावर लागवड करावी.
- सरी वरंबा पध्दतीत लाकडी नांगराच्या सहाय्याने ४५ सें.मी. वरती सऱ्या पाडून घ्याव्यात. वरंबाच्या दोन्ही बाजुस वरुन १/३ भाग सोडून २ इंच खोल, दोन रोपामधील अंतर २२.५ सें.मी. ठेवून लागवड करावी.
- रुंद वरंबा किंवा गादी वाफा पध्दत :- आधुनिक सिंचन पध्दती जसे तुषार सिंचन, ठिबक सिंचनाचा वापर केला जातो अशा ठिकाणी ही पध्दत वापरली जाते. १५ ते २० टक्के उत्पादन जास्त मिळते. जमिनीच्या उतारानुसार ९०-१२० सें.मी. वरती सरी पाडून घ्यावी म्हणजे मधील वरंबा ४५-६० सें.मी. रुंदीचा. दोन रुंद वरंब्यातील पाटाची रुंदी ४५-६० सें.मी. रुंद वरंब्याची उंची २० ते २५ सें.मी. ठेवून २२.५ सें.मी.X२२.५ सें.मी. वरती आले लागवड करावी.

## महाराष्ट्रातील देशी गोवंश

### १.खिल्लार गाय

- **उपनांवे** : माणदेशी, शिकारी, थिल्लार
- **मुळस्थान** : महाराष्ट्रातील सांगली, कोल्हापूर, सातारा, पुणे, सोलापूर व या जिल्ह्यांच्या सीमेलगत असणाऱ्या कर्नाटकातील जिल्ह्यांमध्ये
- **शारिरीक वैशिष्टये** : या गोवंशाचा रंग सहसा पांढरा असतो. काही प्रमाणात किंचीत मळकट रंग सुद्धा आढळतो. कातडी घट्ट चितकलेली व चमकदार असते. कातडीवरील केस चमकदार व बारीक असतात. यांची उंची जवळपास १४०-१५० सें मी पर्यंत असते. शिंगे गुलाबी, काळसर, लांब आणि पाठीमागे निमुळते असतात. कर्नाटक खिल्लार मध्ये शिंगे लहान निमुळती व मुळाशी जवळ असतात. तर माणदेशी खिल्लारमध्ये जाडजूड व मुळाशी थोडे दूर अशी शिंगे असतात. काटक शरीर व तापट स्वभाव यामुळे हे बैल अनेकदा मारके असतात. डोळे काळे व लांबट आकाराचे असतात. चेहऱ्याच्या तुलनेत कान लहान व शेवटला टोक असते. मान लांब व रुंद असते. गळ्याची पोळी म्हणजे गलकंबल मोठे नसते. वशिंड म्हणजे खांदे मध्यम असतात. माणदेशी खिल्लारचे वशिंड मध्यम असते. उत्तम आरोग्य असणाऱ्या या प्रजातीचे खूर गच्च व काळे असतात. शेपूट लांबलचक सापासारखे व शेपूटगोंडा काळा व झुपकेदार असतो.
- **वजन** : बैल : २६०-२७१ किलो, गाय : २१०-२१९ किलो
- **उंची** : बैल : १७५.२५ से.मी. गाय : १२६.५७ से.मी.
- **वेतातील सरासरी दुग्धोत्पादन** : ४५०(२४०-५१५)लिटर

### २. गवळाऊ गाय

- **उपनांवे** : आरवी, गौळंगनी
- **मुळस्थान** : गवळाऊ गाय ही गायीची प्रजाती महाराष्ट्रातील विदर्भ भाग आणि मध्यप्रदेश या राज्यांमध्ये आढळते
- **शारिरीक वैशिष्ट्ये** : पांढरी किंवा हलकी राखाडी त्वचा. मान, कुबड आणि चौथऱ्यावर नरराखाडी, किंचित बहिर्वक्र कपाळ, बदामाच्या आकाराचे, किंचित कोनात ठेवलेले डोळे, मध्यम आकाराचे कान, लहान आणि टोकाला बोथट शिंगे
- **वेतातील सरासरी दुग्धोत्पादन** : ६०४(४७०-७२५)लिटर
- **दुधातील स्निग्धांचे प्रमाणे** : ५.५%

### ३. कोंकण कपिला गाय

- **उपनांवे** : सुवर्ण कपिला
- **मुळस्थान** : महाराष्ट्रातील कोंकणप्रांत, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग तसेच पालघर जिल्हे
- **शारिरीक वैशिष्ट्ये** : मध्यम आकाराचे आणि निमुळते डोके असते. या गोवंशाचे डोळे काळे, कान मध्यम आकाराचे, सावध आणि टोकदार असतात. डोळ्याच्या बाजूने मध्यम आकाराची दोन काळी शिंगे असून, शिंग पाठीमागे वर जाऊन किंचित आत वाळलेली आणि टोकदार असतात. पाय काटक, मजबूत असून पर्वतीय क्षेत्रात फिरण्यासाठी अनुकूल असतात. पायाचे खुर मध्यम, गच्च आणि काळे असतात. या गोवंशाला शेपूट मध्यम लांब असून काळा शेपूट गोंडा असतो.
- **वजन** : बैल : २४० किलो, गाय : २२५ किलो
- **उंची** : बैल : १०६.५४ सेंमी, गाय : १००.७८ सेंमी
- **वेतातील सरासरी दुग्धोत्पादन** : ४५० लिटर

### ४. देवणी गाय

- **उपनांवे** : सुरती, डोंगरपट्टी, डोंगरी, वन्नेरा, वाघ्याड, बालंक्या, शेवेरा
- **मुळस्थान** : लातूर जिल्ह्यातील देवणी तालुका, उस्मानाबाद, परभणी सह कर्नाटकातील बिदर
- **शारिरीक वैशिष्ट्ये** : व्यापक आणि रुंद कान, गुळगुळीत आणि मऊ त्वचा. या देवणी जातीच्या गायी अतिशय संवेदनशील असतात.
- **वेतातील सरासरी दुग्धोत्पादन** : ८६८(६३८-१२२९)लिटर

### ५.डांगी गाय

- **मुळस्थान** : महाराष्ट्रातील नाशिक व अहिल्यानगर जिल्हे
- **शारिरीक वैशिष्ट्ये** : या गोवंशामध्ये संपूर्ण पांढऱ्या रंगावर काळे लहान आकाराचे गोल ठिपके असतात. मस्तक रुंद असून शिंगे लहान, गोलाकार असतात तर डोळे काळे, पाणीदार असतात. जास्त पावसाच्या प्रदेशात यांची कार्यक्षमता टिकून राहते. यांच्या कातडीवर तेलकट स्राव पसरलेला असल्याने पाण्यापासून अपाय होत नाही.काटक आणि ताकदवान असल्यामुळे या जातीच्या गायी डोंगरात जाऊन चरतात
- **वेतातील सरासरी दुग्धोत्पादन** : ४३०(१७५-८००)लिटर

### ६. लाल कंधारी गाय

- **उपनांवे** : कंदाडी
- **मुळस्थान** : नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुका
- **शारिरीक वैशिष्टये** : ही जनावरे मध्यम आकाराची, धडधाकट व दिसण्यास देखणी अशी असतात. प्रमाणबद्ध शरीर आणि त्याच प्रमाणात पायांची रचना असते. अत्यंत चपळ असणाऱ्या या प्रजातीचा रंग लाल ते तपकिरी असून, विशेषतः गायी या फिकट तांबड्या/तपकिरी रंगाच्या व वळू / बैल हे तांबडे/तपकिरी रंगाचे आढळून येतात. मजबूत, डौलदार व काळसर खांदा हे वळूंचे वैशिष्ट्य आहे. शेपटीचा गोंडा काळा असतो. तसेच खूर व नाकपुडी देखील काळी असते. सड/ निरण देखील काळे असून, कान दोन्ही बाजूला समान अंतरावर लोंबकळणारे असतात. मोठे कपाळ व थोडे पुढे आलेले, डोळे काळे पाणीदार व भोवती काळे वर्तुळ असणारे, शिंगे तळात जाड व टोकाला निमुळती असतात. मान आखूड व सरळ असते. मानेखालील पोळी मध्यम आकाराची व घड्या असणारी असते. पाठ मध्यम लांबीची व रुंद असते. कास लहान व शरीराबाहेर असते.
- **वेतातील सरासरी दुग्धोत्पादन** : ५९८लिटर

### ७.कठाणी गाय

- **मुळस्थान** : विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली आणि गोंदिया जिल्हा
- **शारिरीक वैशिष्टये** : हे दुय्यम हेतू, संकुचित शरीर, आडवे आणि सरळ कपाळ असलेले मध्यम आकाराचे गुरे आहे. कठाणी गुरे प्रामुख्याने पांढरी, लालसर आणि काळ्या रंगाची असतात. शिंगे सरळ व वाकडी, पोल नॉन-प्रॉमिनंट आणि आकाराने लहान ते मध्यम आकाराची असतात. कठाणी गुरे कमी इनपुट उत्पादन प्रणालीमध्ये चांगल्याप्रकारे जुळवून घेतात आणि खूराचा त्रास न होता साचलेल्या पाण्यात आणि पावसात भातशेतीसाठी पाणथळ जमिनीला अनुकूल अशी मसुदा क्षमता चांगली असते.
- **वेतातील सरासरी दुग्धोत्पादन** : १९३ लिटर